# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - 411 018.
## करआकारणी व करसंकलन विभाग

| | |
|---|---|
| परिपत्रक स्वरुप | सामान्य करात २% (दोन टक्के) सवलत लागू करणेबाबत.... |
| परिपत्रक क्रमांक | कर/मुख्य/९/कावि/७५६ /२०२१, दिनांक -२७ /०५/२०२१ |
| विषय | प्रामाणिकपणे दरवर्षी मिळकतकराचा भरणा करणा-या मिळकतधारकांना सामान्य करात २% (दोन टक्के)जादा प्रोत्साहनपर सवलत योजना लागु करणेबाबत.. |
| कोणाच्या माहितीसाठी | प्रशासन अधिकारी/सहा.मंडलाधिकारी/गटप्रमुख/रोखपाल / उपलेखापाल |
| संदर्भ | १.मा. महापालिका सभा ठराव क्रमांक ६०७, दिनांक १८/०३/२०२१<br>२.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम,कलम१४०-अ<br>३.करसंकलन विभागाचा दिनांक २०/०५/२०२१ रोजीचा मंजूर प्रस्ताव |

परिपत्रक,

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम१४०-अ च्या तरतूदी अन्वये मालमत्ता कर देण्याकरिता मुख्यतः पात्र असणारी कोणतीही व्यक्ती,असा कर त्या प्रयोजनाकरिता बिलात विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापूर्वी भरत असेल किंवा असा कर संपूर्ण वर्षाकरिता आगाऊ भरत तर,तिला महानगरपालिका,सर्वसाधारण आदेशाद्वारे निर्धारित करेल अशा दराने मालमत्ता कर भरण्यातून सूट देण्यात येईल आणि मालमत्तेच्या वापरकर्त्याच्या वेगवेगळया वर्गाकरिता अशी सूट देण्याचे वेगवेगळे दर विनिर्दिष्ट करता येतील. तदनुसार महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मिळकतधारकांचे मिळकतकरामध्ये विविध कर सवलतीही लागू केलेल्या आहेत.

मा. महापालिका सभा ठराव क्रमांक६०७,दिनांक१८/०३/२०२१अन्वये विहित मुदतीत न चुकता प्रामाणिकपणे दरवर्षी मिळकत कराचा भरणा करणा-या मिळकतधारकांना सन्मानित / प्रोत्साहित करणेकामी खालील नमूद प्रमाणे प्रोत्साहनपर सवलत योजना राबविणेस मान्यता दिलेली आहे. त्या अनुषंगाने अशा कर सवलतीस पात्र ठरणा-या मिळकतधारकांच्या मिळकतीना सामान्य करात सवलत देणेबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१. ज्या मिळकतधारकांनी सन २०१८-२०१९ ते सन २०२०-२०२१ या मागील ३ (तीन)सलग आर्थिक वर्षामध्ये त्या त्या वर्षाच्या ३१ मार्च पूर्वी विहित मुदतीत थकबाकीसह संपूर्ण मिळकत कराचा एकरकमी भरणा केला आहे, अशा मिळकतधारकांनी सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षामध्ये थकबाकीसह संपूर्ण मिळकत कराचा एकरकमी भरणा दिनांक ३१ मार्च २०२२ पूर्वी केलेस अशा मिळकतधारकांना चालू वर्षाच्या म्हणजेच चौथ्या वर्षाच्या मागणीतील सामान्य करात २% (दोन टक्के)जादा प्रोत्साहनपर सवलत देण्यात यावी.

२. वरीलप्रमाणे सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षामध्ये सवलत घेतलेल्या मिळकतधारकांना विषयांकित सवलतीचा लाभ पुनश्च घेणेकरिता सन २०२१-२०२२ ते सन २०२३-२०२४ या कालावधीचा सलग तीन वर्षाचा मिळकतकर त्या त्या आर्थिक वर्षाच्या ३१ मार्चपूर्वी विहित मुदतीत थकबाकीसह एकरकमी जमा केलेनंतर सन २०२४-२०२५ या वर्षामध्ये पुढील सवलत देय राहील.

कृपया मागे पहा.....

३. अशा प्रकारे उपरोक्त मुद्दा क्र.१ व २ चे कार्यपद्धतीनुसार सन २०१८-२०१९ पासून किंवा त्यापुढील सलग ३ वर्षे त्या त्या वर्षीच्या ३१ मार्च पूर्वी विहित मुदतीत थकबाकीसह संपूर्ण मिळकत कराचा एकरकमी भरणा केलेला आहे, अशा मिळकतधारकांना ४ थ्या वर्षामध्ये थकबाकीसह संपूर्ण मिळकत कराचा एकरकमी भरणा त्या वर्षीच्या ३१ मार्च पूर्वी केलेस अशा मिळकतधारकांना त्या वर्षाच्या म्हणजेच चौथ्या वर्षाच्या मागणीतील सामान्य करात २% (दोन टक्के) जादा प्रोत्साहनपर सवलत देण्यात यावी.

४. पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात राहणा-या व वरील अटीची पूर्तता करणाऱ्या सर्व प्रकारच्या मिळकतधारकांना फक्त सामान्य करात २% (दोन टक्के)सूट लागू राहील.

५. अशा कर माफीस पात्र ठरणाऱ्या मिळकतधारकांची सवलत घेण्याचे पूर्वीची सलग तीन वर्षाची थकबाकी निरंक (शून्य) असणे बंधनकारक राहील.

६. सामान्य कराव्यतिरिक्त अन्य कोणत्याही करावर सवलत लागू राहणार नाही.

७. मिळकतधारकांनी सदर करमाफीचा लाभ घेण्यासाठी सूट / सवलतीची रक्कम वगळता थकबाकीसह संपूर्ण व एकरकमी मिळकतकर रक्कम भरणे अनिवार्य राहिल.

८. मिळकतधारकास मिळकतकराचे बिल प्रत्यक्ष प्राप्त झालेले असो अथवा नसो तथापि उपरोक्त अटीची पूर्तता करणे बंधनकारक राहील.

९. सदर सवलत ही कर व करेत्तर दरपत्रकातील नमूद १ ते ५ मधील नमूद सवलतपात्र मिळकतधारकांसह सर्व मिळकतधारका करिता लागु राहील.

१०. सदर परिपत्रकानुसार पात्र मिळकतधारकांना संगणक प्रणालीद्वारे सामान्य करात २% (दोन टक्के) सूट देणेबाबतची कार्यवाही व तदनुषंगिक त्रुटींचे निराकरण माहिती व तंत्रज्ञान विभागाने करावयाचे आहे. त्यासाठी संगणक प्रणालीमध्ये आवश्यक ते बदल करणेत यावेत.

११. प्रस्तुत परिपत्रकाची अंमलबजावणी परिपत्रकाचे दिनांकापासून करण्यात यावी. विषयांकित सवलत योजना पुढील आदेश होईपर्यंत लागु करण्यास मान्यता देणेत येत आहे.

२०/०५/२१

(राजेश पाटील)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

प्रति, 1) प्रशासन अधिकारी / सहा.मंडलाधिकारी, गटप्रमुख,सर्व विभागीय कार्यालय

प्रत : 1) मुख्य लेखापरिक्षण विभाग 2) लेखा विभाग 3) माहिती तंत्रज्ञान विभाग
4) सर्व क्षेत्रीय कार्यालय 5) मे. टेक 9 सर्व्हिसेस
6) सर्व महापालिका विभाग (इमेल द्वारे)

२/-प्रस्तुत परिपत्रक आपले अखत्यारीतील सर्व अधिकारी /कर्मचाऱ्यांचे निदर्शनास आणून द्यावे व प्रस्तुत करसवलतीचा लाभ घेऊन मिळकतकर भरण्यास प्रोत्साहित करावे.

(स्मिता झगडे)
उप आयुक्त,करसंकलन
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८